जनसंपर्क कक्ष
2 4 MAR 2022 लोकसत्ता शिवाजी विद्यापीठ. कोल्हापूर

# कोल्हापुरात एप्रिलमध्ये विश्वात्मक संत साहित्य संमेलन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** पहिले विश्वात्मक संत साहित्य संमेलन येथे ५ व ६ एप्रिल रोजी होणार आहे. संमेलनाचे उद्घाटन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते होईल. भारत सरकार कंपनी लवादाचे सदस्य, न्यायमूर्ती डॉ. मदन महाराज गोसावी संमेलनाचे अध्यक्षपद भूषविणार आहेत. संत साहित्य अभ्यासक प्रा. डॉ. सदानंद मोरे स्वागताध्यक्ष आहेत. पितळी गणपती ते महासैनिक दरबार हॉल येथे दिंडी होईल.

कार्यक्रमस्थळी चित्र दालन, ग्रंथ दालन उभारले जाणार आहे. शांतिब्रह्म मारुती महाराज कुरेकर यांना संत शिरोमणी जीवन गौरव पुरस्काराने, तर हरिद्वारचे महंत ऋषीश्वरानंद यांना विश्वात्मक संत जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल. ६ रोजी समारोप समारंभात विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, त्रिपुरा राज्याचे उपमुख्यमंत्री जिष्णुदेव वर्मा, स्वामी नरेंद्रानंद, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित राहतील, अशी माहिती डॉ. प्रकाश खांडगे, ॲड. अक्षय गोसावी, रंगनाथ नाईकडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

तरुण भारत

# विद्यापीठात शहिदांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. पी. डी. पाटील, महेश साळुंखे, महेश वाघ, वैभव कांबळे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत

# आता विद्यापीठात निवडणूक प्रक्रियेवर अभ्यासक्रम

## राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांची माहिती

प्रतिनिधी
सांगली

निवडणूक प्रक्रियेबाबतची ओळख विद्यार्थ्यांना होण्यासाठी पुणे विद्यापीठात अशा पद्धतीचा अभ्यासक्रम येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू होत आहे. शिवाजी विद्यापीठातही तो लवकरच सुरू होणार असून विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप प्रोग्रॅमबाबतही विचार सुरू असल्याची माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दिली. त्याचबरोबर एकापेक्षा जास्त ठिकाणी मतदार यादीमध्ये नाव असणे हा गंभीर गुन्हा असून अशा मतदारांना त्वरित नोटीस जारी करावी व अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करा, असे आदेशही त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

ते बुधवारी जिल्हा दौऱ्यावर होते. मतदान नोंदणी, मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी आवश्यक उपाययोजना आदींचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हा पोलीस अधिक्षक दीक्षित गेडाम व अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, देशपांडे यांनी मतदान प्रक्रियेत विद्यार्थी आणि महाविद्यालयांचा सहभाग वाढवावा., असे म्हटले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात लवकरच निवडणूक प्रक्रिया अभ्यासक्रम

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात १८ ते २१ वयोगटातील विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यांना निवडणूक प्रक्रियेची ओळख होणे गरजेचे आहे. त्यासाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून पुणे विद्यापीठात या पद्धतीचा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठातदेखील तो लवकरच सुरू होईल, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी दिली. ते म्हणाले, राज्यातील युवकांच्या संख्येच्या तुलनेत मतदार नोंदणी फार कमी झालेली आहे. ती का कमी आहे, याची कारणे तातडीने शोधणे गरजेचे आहे.

जनसंपर्क कक्ष
2 4 MAR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. प्रतिभा देसाई यांना 'नारी सन्मान' पुरस्कार



हैद्राबाद येथे'नारी सन्मान-२०२२" पुरस्कार स्विकारताना शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्रच्या डॉ. प्रतिभा देसाई.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्राच्या डॉ. प्रतिभा देसाई यांना सिफा आंतरराष्ट्रीय अवार्ड-२०२२ अंतर्गत शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. याबद्दल हैद्राबाद येथील होलिस्टिक मेडिसिन रिसर्च फाउंडेशनकडून 'नारी सन्मान-२०२२" या पुरस्काराने गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम हैद्राबाद येथील भारतीय विद्या भवन सभागृहात झाला. डॉ. प्रतिभा देसाई या शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागात २००८ रुजू झाल्या. त्याचबरोबर त्या 'यु. जी. सी. स्कीम फॉर पर्सन विथ डिसअॅबिलिटी" आणि शिवाजी विद्यापीठाच्या 'बेटी बचावो अभियान" च्या समन्वयिका म्हणून कार्यरत आहेत. तसेच शैक्षणिक कार्यातही त्या अग्रेसर आहेत, त्यांच्या या कार्याची नोंद घेवून त्यांना 'नारी सन्मान-२०२२" या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

पुढारी

# प्रा. डॉ. प्रतिभा देसाई यांचा 'नारी सन्मान' पुरस्काराने गौरव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्राच्या सहायक प्रा. डॉ. प्रतिभा देसाई यांना सिफा आंतरराष्ट्रीय ॲवॉर्ड-२०२२ अंतर्गत शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल होलिस्टिक मेडिसिन रिसर्च फाऊंडेशन, हैदराबादकडून 'नारी सन्मान-२०२२' या पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. देसाई विद्यापीठातील समाजशास्त्र अधिविभागात २००८ ला रुजू झाल्या. त्याचबरोबर त्या 'यु. जी. सी. स्कीम फॉर पर्सन विथ डिसॲबिलिटी' व शिवाजी विद्यापीठाच्या 'बेटी बचावो अभियान' च्या समन्वयिका आहेत.

Times of India

# SUK signs MoU with Cuban govt

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Cuban ministry of science, technology and environment has signed a Memorandum of Understanding (MoU) with the Shivaji University in Kolhapur (SUK) to make significant strides towards global sustainable development, said Adilaidis Ruiz Barsenaz, the director of Cuba's National Silk Project.

The MoU was signed between the Center for Research in Protein Plants and Bonatural Products of the Cuban Ministry of Science & Technology and the SUK recently.

Barsenaz said that SUK had an agreement with the Cuban government from 2013 to 2018.

The then President of Cuba, Fidel Castro, had appointed Dr A D Jadhav as a consultant to the Cuban National Silk Project. Since then, Dr Jadhav has been doing his job sincerely for the past 10 years.

In recognition of his work, the Cuban government has honoured him with the 'Innovation 2021' award. We hope that this new reconciliation agreement would lead to similar research and sustainable development".

Dr Jadhav said, "The MoU is for five years from 2022 to 2027. Under this, educational and research programs will be implemented regularly by both the institutes. Research on silkworm will also be conducted through exchange of innovative technologies as well as mulberry, silkworms, rearing technology, organic fertilizers, friendly pests and diseases, value added products, recycling of sericulture waste etc."

Meetings of scientists and technicians from both the countries will be organized to develop technologies suitable for both the countries. Students from both the institutes will also work together on academic and research projects.

Dr Jadhav was handed over the award received from the Cuban government in this event. SUK vice chancellor Dr D T Shirke, pro-vice chancellor Dr P S Patil were also present for the event.

पुढारी

# ऑनलाईन परीक्षेतील अडचणींची माहिती द्या

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर, नोव्हेंबर २०२१ मधील हिवाळी सत्रात घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेत ज्या तांत्रिक अडचणी आल्या, त्याची माहिती सादर करण्याचे आदेश शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयांना दिले आहेत. २३ मार्च ते १ एप्रिल २०२२ या कालावधीत विद्यापीठाच्या पोर्टलवर तक्रार करावी, असे आवाहन परीक्षा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

तरूण भारत

# 'माणसांची गोष्ट सांगणारा दास्तांगोई कलाप्रकार'

प्रतिनिधी
कोल्हापूर

दास्तांगोई हा उर्दू कलाप्रकार माणसांच्या गोष्टी सांगणारा आहे. त्यातून कोणताही कालक्रमिक इतिहास नाही, असे अभिनेता अक्षय शिंपी यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागांमध्ये दास्तांगोई या उर्दु कलाप्रकाराविषयी अक्षय शिंपी आणि धनश्री खंडकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिंपी यांनी दास्तांगोई या उर्दु कलाप्रकाराचा प्रारंभ, त्याचे भारतीय कलाविश्वातील स्थान, विकास आणि महत्त्व विशद केले. हा कलाप्रकार मराठी रंगभूमीवर पहिल्यांदाच आणत असताना त्या पाठीमागचा उद्देश स्पष्ट केला. तर धनश्री खंडकर यांनी 'दास्तां ए बडी बाका" या प्रयोगाच्या निर्मिती प्रक्रियेविषयी माहिती दिली. त्यांनी 'दास्तां ए बडी बाका" या प्रयोगातील एका प्रसंगाचे सादरीकरणही केले.

प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन सुष्मिता खुटाळे यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी मानले. यावेळी मराठी विभागातील डॉ. मोरे, दत्ता देसाई विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
2 4 MAR 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परीक्षेत तांत्रिक अडचणी ; १ एप्रिलपर्यंत अर्ज भरा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाअंतर्गत सुरू असलेल्या हिवाळ परीक्षा देण्यासाठी विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी आल्या असतील अशा विद्यार्थ्यांनी आपली ऑनलाईन माहिती http://www.unishivaji.ac.in या पोर्टलवर व http://studentapps.unishivaji.ac.in/oct21Re-exam या लिंकवर १ एप्रिलपर्यंत भरावयाची आहे, अशा सूचना परिपत्रकाव्दारे विद्यापीठाने दिल्या आहेत. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा चालू आहे, त्यांना पेपर देताना अडचण येत असतील तर दुसऱ्या दिवशी या लिंकवर माहिती भरावयाची आहे. ही सुविधा ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२१ साठी अर्ज भरलेल्या तसेच परीक्षा देताना तांत्रिक अडचणी आलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे, याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.